# पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण

ईमेलआयडी-pireader.solapur.r@gmail.com
फॅक्स क्रमांक-०२१७ / २७३२००८

---

**प्रेस नोट दि. २३/०७/२०२०**

## कोरोना प्रार्दुभावाच्या अनुशंगाने सोलापूर ग्रामीण पोलीस दलास उत्कृष्ट दर्जाचे मास्क व फेसशिल्ड चे वाटप.

सध्दस्थितीत संपुर्ण देशात तसेच महाराष्ट्रात कोरोना (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचे मोठयाप्रमाणात रुग्ण आढळून आले असून, कोरोना (कोव्हिड १९) हा संसर्गजन्य आजार असून त्याचा सोलापूर जिल्हयात संसर्ग वाढत आहे. पोलीस अधिकारी/कर्मचारी हे कोरोना विषाणुचा संसर्ग पसरु नये याकरीता अहोरात्र आपले कर्तव्य बजावत आहेत. कर्तव्य बजावित असताना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कोरानो विषाणुचा प्रार्दुभाव होऊ नये यासाठी डॉ. श्री. गौतम विठठल जगताप, सौ. नंदीनी गौतम जगताप रा. वैराग, जि. सोलापूर यांनी स्वत: पुढाकार घेवून तसेच श्रीमती अर्चना गायकवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अकलूज यांनी उत्कृष्ठ दर्जाचे **N- 95** मास्क ५००० नग व फेसशिल्ड १००० नग सोलापूर ग्रामीण हद्दीतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता देण्यात आली आहेत.

सदरचे N- 95 मास्क व फेसशिल्ड मुळे पोलीस अधिकारी कर्मचारी यांना बंदोबस्त करताना तसेच त्यांचे कर्तव्य बजावित असताना नक्कीच उपयोग होणार आहे. असे मत पोलीस अधिक्षक श्री मनोज पाटील यांनी व्यक्त केले आहे. सदरचे N- 95 मास्क व फेसशिल्ड मुळे सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकारी कर्मचारी यांना मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली वाटप करण्यात आले आहेत.

सदरची बातमी आपले लोकप्रिय दैंनिकातून प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रति,

सर्व संपादक, सोलापूर.








कारकुन कक्ष (नगदी/मुद्देमाल)